सुबोध दासबोध

डॉ. सी. ग. देसाई





श्रीदासबोध हा श्रीसमर्थ रामदासस्वामींचा ओवीबद्ध ग्रंथ.
गुरू व शिष्य यांच्यात झालेला संवाद हे त्याचे स्वरूप.
महाराष्ट्रातील संतवाङ्मयाच्या खजिन्यातील
हा एक चमकणारा हिरा.
भक्तिमार्ग, शुद्धज्ञान, वैराग्य, मुक्ती, मुख्य देव,
उपासनांचे विविध प्रकार, चातुर्याची लक्षणे,
आपल्या मनात निर्माण होणारे असंख्य प्रश्न व
त्यांची उत्तरे या सर्वांविषयी दासबोधात चर्चा केली आहे.
ह्या ग्रंथाची रचना शास्त्रांचा आधार व प्रत्यक्ष
आपला अनुभव यांच्या सहाय्याने
स्वामींनी केली आहे. त्यामुळे त्यांचे सिद्धान्त
निश्चित स्वरूपाचे आहेत.
दासबोध वाचून काय फायदा होईल?
या प्रश्नाचे उत्तर अगदी सोपे.
'जयाचा भावार्थ जैसा। तयास लाभ तैसा।।

प्रकाशक :
पंचतत्त्व प्रकाशन
१/५ शहा बिल्डिंग, डॉ. सीताराम गणेश देसाई मार्ग, माहिम, मुंबई ४०० ०१६
दूरध्वनी : +९१ २२ २४३० ७६९९, मोबाईल : +९१ ९८२०० ४५३२४
Email : panchatattvaprakashan@gmail.com

परिशिष्ट १ - श्रीदासबोधातील सुवचने

नाना सुकृताचें फळ । तो हा नरदेह केवळ ॥ (२.४.१)
नरदेहाचें उचित । कांहीं करावें आत्महित ॥ (२.४.१३)
या नरदेहाचेनि संगती । बहुत पावले उत्तम गति ॥ (३.१०.३७)
संसार हाचि दुःखमूळ । लागती दुःखाचे इंगळ ॥ (३.२.१)
संसार म्हणजे सवेंच स्वार । नाहीं मरणासी उधार ॥ (३.९.१)
माया तोडितां तुटेना । ज्ञानेंविण ॥ (७.१.५९)
मीपण म्हणिजे जीवपण । जीवपण म्हणजे अज्ञान ॥ (७.२.२०)
आधी कष्ट मग फळ । कष्टचि नाहीं तें निर्फळ ॥ (११.१०.२०)
जैसें बोलणें बोलावें । तैसेंचि चालणें चालावें ॥ (१२.९.२३)
जाणत्याची संगती धरावी । जाणत्याची सेवा करावी ॥ (१८.२.१)
विषय जनित जें जें सुख । तेथेंचि होतें परम दुःख ॥ (३.१०.६५)
तनें मनें झिजावें । तेणें भलें म्हणोनी घ्यावें ॥ (१४.६.२१)
जो दुसऱ्यावरी विश्वासला । त्याचा कार्यभाग बुडाला ।
जो आपणचि कष्टत गेला । तोचि भला ॥ (१९.९.१६)
विवेकाचें फळ तें सुख । अविवेकाचें फळ तें दुःख ॥ (१३.७.२८)
विवेकेंविण जो भाव । तो भावचि अभाव ॥ (१८.८.१६)
मन भलतीकडे धांवें । तें विवेकें आवरावें ॥ (२.७.७०)
जेथें मुरालें मीपण । तेंचि अनुभवाची खूण ॥ (६.१०.१७)
देहबुद्धीचा संशयो । करी समाधानाचा क्षयो ॥ (७.२.३३)
आळसें कार्यभाग नासतो ॥ (१४.६.२७)
जितुका व्याप तितुकें वैभव । वैभवासारिखा हावभाव ॥ (१४.६.२६)
भिक्षा मागोन जो जेविला । तो निराहारी बोलिला ॥ (१४.२.२)
आवाहन विसर्जन । हेंचि भजनाचें लक्षण ॥ (२०.८.३०)
या नांव हरिदास । जयांसि नामीं विश्वास ॥ (१४.६.४१)
भगवद्भक्ति हे उत्तम । त्याहीवरी सत्समागम ॥ (२.४.३)
पुण्यसामग्री पुरती । तयासीच घडे भगवद्भक्ती ॥ (१४.६.४१)
जो जाणेल भगवंत । तया नांवे बोलिजे संत ॥ (६.१.१६)
संत आनंदाचें स्थळ । संत सुखचि केवळ ॥ (१.५.१६)

ज्याचे अंतरीं ज्ञान जागे । तोचि साधु ॥ (६.१.१८)
अभ्यासाचा मुगुटमणी । वृत्ती राहावी निर्गुणी ॥ (८.९.२१)
मुख्य सद्गुरूचें लक्षण । आधीं पाहिजे विमल ज्ञान ॥ (५.२.४५)
सद्गुरुकृपा कळे त्यासी । जो शोधील आपणासी ॥ (६.१०.११)
माया ब्रह्म वोळखावें । तयासी अध्यात्म म्हणावें ॥ (७.१.५४)
जयास एकांत मानला । अवघ्या आधीं कळे त्याला ॥ (१८.१०.५०)
वैराग्य नसतां योग्य । परमार्थ नव्हे ॥ (१२.७.१७)
अंतरापासून वैराग्य । तेंचि जाणावें महद्भाग्य ॥ (१४.७.१०)
ऐक ज्ञानाचें लक्षण । ज्ञान म्हणिजे आत्मज्ञान ॥ (५.६.१)
पाहावें आपणासी आपण । या नांव ज्ञान ॥ (५.६.१)
आपला आपणासी लाभ । हें ज्ञान परम दुर्लभ ॥ (५.६.१५)
उपासना म्हणिजे ज्ञान । ज्ञानें पाविजे निरंजन ॥ (२०.४.२२)
प्रचीतीविण ज्ञान । तेथें नाहीं समाधान ॥ (१०.८.१६)
प्रचीतीविण ज्ञान सांगणें । या नांव भ्रम ॥ (१०.७.३२)
क्रियेवीण शब्दज्ञान । तया न मानिती सज्जन ॥ (१४.३.५)
मीपण गेलिया निर्गुण । आत्माचि स्वयें ॥ (६.३.२९)
अहं आत्मा हें कधींचि । विसरों नये ॥ (५.१०.३८)
देह देऊळ आत्मा देव । कोठें धरूं पाहतां भाव ॥ (१४.८.२९)
उपासना सकळा ठाईं । आत्माराम कोठे नाहीं ॥ (१५.१०.९८)
जैसा भाव जयापासी । तैसा दैव तयासी ॥ (३.१०.१३)
देव म्हणजे आपुला प्राण । प्राणासी न करावें निर्वाण ॥ (४.८.१०)
आपण असतां अनन्यभावें । देव तत्काळचि पावे ॥ (४.८.१३)
जैसें जयाचें भजन । तैसाचि देवहि आपण ॥ (४.८.१४)
आपण मिथ्या साच देव । देव भक्त अनन्यभाव ॥ (४.९.२२)
देवास जयाची अत्यंत प्रीती । आपण वर्तावें तेणें रीती ॥ (४.८.३)
पृथकाकारे स्वतंत्र । जितुके देव तितुके मंत्र ॥ (५.४.८)
बहुत देव सृष्टीवरी । त्यांची गणना कोण करी ॥ (८.१.८)
जेणें निर्मिले लोक तिनी । तया नांव देव ॥ (८.१.२०)
बहुत लोकांचा दंडक । प्रतिमा देवीं ॥ (११.२.२९)
देव अंतरात्मा सगुण । सगुणें पाविजे निर्गुण ॥ (१४.९.१३)

नाना देवीं भजन केलें । तें मूळ पुरुषासी पावलें ॥ (११.५.१४)
भगवंत भावाचा भुकेला । भावार्थ देखोन भुलला ॥ (३.१०.१०)
जयास भगवंत आवडे । तयाचें देवास सांकडे ॥ (३.१०.१०)
निःशेष दुराशा तुटे । तरीच भगवंत भेटे ॥ (५.२.३६)
जें जें भगवंताचें निजरूप । त्यास बोलिजे स्वरूप ॥ (९.२.३)
भगवंती लागलें मन । तेणे नाठवे देहभान ॥ (१४.३.२८)

परिशिष्ट २ - आत्माराम वचनामृत

ईश्वरापासून जालासी । परी तूं तयासी चुकलासी ॥ (१.२९)
असे सत्ता तेचि तत्त्वतां । माया जाण ॥ (२.२१)
सकळहि माया परी नाथिली । स्वरूपीं तो नाहीं राहिली ॥ (२.२८)
संग तितुका नांशिवंत । सांडून राहवे निवांत ॥ (३.१)
श्रवण आणि मनन । या ऐसें नाहीं साधन ॥ (४.५)
प्राणी देह सोडून जाती । परि वासनात्मक शरीरें उरती ॥ (४.२५)
तरी मनाचा थारा तुटला । म्हणिजे भवसिंधु आटला ॥ (४.२८)
हेंचि जाण भक्तीचें फळ । जेणें तुटे संसारमूळ ॥ (४.२९)
संदेह हेंचि बंधन । निशेष तुटला तेंचि ज्ञान ॥ (५.१५)
सर्वसाक्षी तुर्यावस्था । तयेचाहि तूं जाणता ॥ (५.१९)

परिशिष्ट ३ - रामदास म्हणणे मग तेव्हा

भव्यरूप अतिसुंदर दीक्षा । रामनाम स्मरणें करि भिक्षा ।
वृत्ति होईल उदासिन जेव्हां । रामदास म्हणणे मग तेव्हां ॥ १ ॥
नाठवे धनसुतालय जाया । मृगजळापरि भावित काया ।
परवधू जननीसम जेव्हां । रामदास म्हणणें मग तेव्हां ॥ २ ॥
शुद्ध भक्त हरिची करि पूजा । विश्व पाहे आपणासम वोजा ।
शांति पूर्ण बरवी धरि जेव्हां । रामदास म्हणणें मग तेव्हां ॥ ३ ॥
करि कथा परि न वांछित कांहीं । चित्तवृत्ति अवघी हरिपायीं ।
कल्पना समुळ तोडिला जेव्हां । रामदास म्हणणें मग तेव्हां ॥ ४ ॥
नित्य नेम बरवा जगिं ज्याचा । प्रतिदिनीं हरिचे भजनाचा ।
गुरुपदीं रचना असे जेव्हां । रामदास म्हणणें मग तेव्हां ॥ ५ ॥

सर्व लोक भजनाप्रति लावी । लालुची धनिं कदापि नसावी ।
बोलणें सम क्रिया घडे जेव्हां । रामदास म्हणणें मग तेव्हां ॥ ६ ॥
विमल ज्ञान बोले जगिं स्पष्ट । ब्रह्म निर्गुण कळे जगिं श्रेष्ठ ।
सर्व माइक असे कळे जेव्हां । रामदास म्हणणें मग तेव्हां ॥ ७ ॥
बोलणें प्रचितिचें जगि मान्ये । निवऊं जो सकळांप्रति जाणें ।
वांछिती जन सज्जन जेव्हां । रामदास म्हणणें मग तेव्हां ॥ ८ ॥
निश्चयें करि रामउपासना । रामनौमि रघोत्तमपूजना ।
तृप्त होति द्विज याचक जेव्हां । रामदास म्हणणें मग तेव्हां ॥ ९ ॥
यत्न साधुन करी पुढें पाठ । अर्थ जाणुनि वदे जगिं स्पष्ट ।
मागिलें उजळणीं करि जेव्हां । रामदास म्हणणें मग तेव्हां ॥ १० ॥

परिशिष्ट ४ - दासबोधातील काही समास - मूळ पाठ वाचनासाठी

(१)

(दशक ४, समास ३ - नामस्मरण)

॥ श्रीराम ॥ मागां निरोपिलें कीर्तन । जें सकळांस करी पावन । आतां ऐका 'विष्णोः स्मरण' । तिसरी भक्ती ॥ १ ॥ स्मरण देवाचें करावें । अखंड नाम जपत जावें । नामस्मरणें पावावे । समाधान ॥ २ ॥ नित्यनेम प्रातःकाळीं । माध्यानकाळीं सायंकाळी । नामस्मरण सर्वकाळीं । करीत जावें ॥ ३ ॥ सुखदुःख उद्वेग चिंता । अथवा आनंदरूप असतां । नामस्मरणेंविण सर्वथा । राहोंच नये ॥ ४ ॥ हर्षकाळीं विषमकाळीं । पर्वकाळीं प्रस्तावकाळीं । विश्रांतिकाळीं निद्राकाळीं । नामस्मरण करावें ॥ ५ ॥ कोडें सांकडें संकट । नाना संसारखटपट । अवस्था लागतां चटपट । नामस्मरण करावें ॥ ६ ॥ चालतां बोलतां धंदा करितां । खातां जेवितां सुखी होतां । नाना उपभोग भोगितां । नाम विसरों नये ॥ ७ ॥ संपत्ती अथवा विपत्ती । जैसी पडेल काळगती । नामस्मरणाची स्थिती । सांडूंच नये ॥ ८ ॥ वैभव सामर्थ्य आणी सत्ता । नाना पदार्थ चालतां । उत्कट भाग्यश्री भोगितां । नामस्मरण सांडूं नये ॥ ९ ॥ आधीं अवदसा मग दसा । अथवा दसेउपरी अवदसा । प्रसंग असो भलतैसा । परंतु नाम सोडूं नये ॥ १० ॥ नामें संकटें नासती । नामें विघ्नें

निवारती । नामस्मरणें पाविजेती । उत्तम पदें ॥ ११ ॥ भूत पिशाच्य नाना छंद । ब्रह्मगृहो ब्राह्मणसमंध । मंत्रचळ नाना खेद । नामानिष्ठें नासती ॥ १२ ॥ नामें विषबाधा हरती । नामें चेडें चेटकें नासती । नामें होय उत्तम गती । अंतकाळीं ॥ १३ ॥ बाळपणीं तारुण्यकाळीं । कठिण काळीं वृद्धापकाळीं । सर्वकाळीं अंतकाळीं । नामस्मरण असावें ॥ १४ ॥ नामाचा महिमा जाणे शंकर । जनां उपदेशी विश्वेश्वर । वाराणसी मुक्तिक्षेत्र । रामनामेंकरूनी ॥ १५ ॥ उफराट्या नामासाठीं । वाल्मीक तरला उठाउठीं । भविष्य वदला शतकोटी । चरित्र रघुनाथाचें ॥ १६ ॥ हरिनामें प्रल्हाद तरला । नाना आघातांपासून सुटला । नारायणनामें पावन जाला । अजामेळ ॥ १७ ॥ नामें पाषाण तरले । असंख्यात भक्त उद्धरले । महापापी तेचि जाले । परमपवित्र ॥ १८ ॥ परमेश्वराचीं अनंत नामें । स्मरतां तरिजे नित्यनेमें । नामस्मरण करितां यमें । बाधिजेना ॥ १९ ॥ सहस्त्रनामांमधें कोणीयेक । म्हणतां होतसे सार्थक । नाम स्मरतां पुण्यश्लोक । होईजे स्वयें ॥ २० ॥ कांहींच न करूनि प्राणी । रामनाम जपे वाणी । तेणें संतुष्ट चक्रपाणी । भक्तांलागीं सांभाळी ॥ २१ ॥ नाम स्मरें निरंतर । तें जाणावें पुण्यशरीर । महांदोषांचे गिरिवर । रामनामें नासती ॥ २२ ॥ अगाध महिमा न वचे वदला । नामें बहुत जन उद्धरला । हळहळापासून सुटला । प्रत्यक्ष चंद्रमौळी ॥ २३ ॥ चहूं वर्णां नामाधिकार । नामीं नाहीं लहानथोर । जड मूढ पैलपार । पावती नामें ॥ २४ ॥ म्हणोनी नाम अखंड स्मरावें । रूप मनीं आठवावें । तिसरी भक्ती स्वभावें । निरोपिली ॥ २५ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे नामस्मरणभक्तिनाम समास तृतीय ॥ ३ ॥

(२)

(दशक १३, समास ८ - कर्तानिरूपण)

॥ श्रीराम ॥ श्रोता म्हणे वक्तयासी । कोण कर्ता निश्चयेंसीं । सकळ सृष्टि ब्रह्मांडासी । कोणें केलें ॥ १ ॥ तंव बोलिले सभानायक । जे बोलिक येकाहून येक । या बोलण्याचें कौतुक । श्रोतीं सादरें ऐकावें ॥ २ ॥ येक म्हणती कर्ता देव । येक म्हणती कोण देव । आपुलाला अभिप्राव । बोलते जाले ॥ ३ ॥ उत्तम मध्यम कनिष्ठ । भावार्थें बोलती पष्ट । आपुलाली उपासना श्रेष्ठ । मानिती जनीं ॥ ४ ॥ कोणियेक ऐसें म्हणती । कर्ता देव मंगळमूर्ति । येक म्हणती सरस्वती । सर्व करी ॥ ५ ॥ येक म्हणती कर्ता भैरव । येक म्हणती खंडेराव ।

येक म्हणती वीरदेव । येक म्हणती भगवती ॥ ६ ॥ येक म्हणती नरहरी । येक म्हणती बनशंकरी । येक म्हणती सर्व करी । नारायंणु ॥ ७ ॥ येक म्हणती श्रीराम कर्ता । येक म्हणती श्रीकृष्ण कर्ता । येक म्हणती भगवंत कर्ता । केशवराज ॥ ८ ॥ येक म्हणती पांडुरंग । येक म्हणती श्रीरंग । येक म्हणती झोटिंग । सर्व करी ॥ ९ ॥ येक म्हणती मुंज्या कर्ता । येक म्हणती सूर्य कर्ता । येक म्हणती अग्नि कर्ता । सकळ कांहीं ॥ १० ॥ येक म्हणती लक्ष्मी करी । येक म्हणती मारुती करी । येक म्हणती धरत्री करी । सर्व कांहीं ॥ ११ ॥ येक म्हणती तुकाई । येक म्हणती यमाई । येक म्हणती सटवाई । सर्व करी ॥ १२ ॥ येक म्हणती भार्गव कर्ता । येक म्हणती वामन कर्ता । येक म्हणती परमात्मा कर्ता । येकचि आहे ॥ १३ ॥ येक म्हणती विरंणा कर्ता । येक म्हणती वस्वंणा कर्ता । येक म्हणती रेवंणा कर्ता । सर्व कांहीं ॥ १४ ॥ कोणी म्हणती खळ्या कर्ता । येक म्हणती स्वामी कार्तिक कर्ता । येक म्हणती वेंकटेश कर्ता । सर्व कांहीं ॥ १५ ॥ येक म्हणती गुरु कर्ता । येक म्हणती दत्त कर्ता । येक म्हणती मुख्य कर्ता । वोढ्या जगन्नाथ ॥ १६ ॥ येक म्हणती ब्रह्मा कर्ता । येक म्हणती विष्णु कर्ता । येक म्हणती महेश कर्ता । निश्चयेंसी ॥ १७ ॥ येक म्हणती पर्जन्य कर्ता । येक म्हणती वायो कर्ता । येक म्हणती करून अकर्ता । निर्गुण देव ॥ १८ ॥ येक म्हणंती माया करी । येक म्हणती जीव करी । येक म्हणती सर्व करी । प्रारब्धयोग ॥ १९ ॥ येक म्हणती प्रेत्न करी । येक म्हणती स्वभाव करी । येक म्हणती कोण करी । कोण जाणे ॥ २० ॥ ऐसा कर्त्यांचा विचार । पुसतां भरला बाजार । आतां कोणाचें उत्तर । खरें मानावें ॥ २१ ॥ जेहीं जो देव मानिला । कर्ता म्हणती तयाला । ऐसा लोकांचा गलबला । वोसरेना ॥ २२ ॥ आपुलाल्या साभिमानें । निश्चयेचि केला मनें । याचा विचार पाहणें । घडेचिना ॥ २३ ॥ बहु लोकांचा बहु विचार । अवघा राहों द्या बाजार । परंतु याचा विचार । ऐसा आहे ॥ २४ ॥ श्रोतीं व्हावें सावधान । निश्चयें तोडावा अनुमान । प्रत्ययो मानावा प्रमाण । जाणते पुरुषीं ॥ २५ ॥ जें जें कर्तयानें केलें । तें तें त्याउपरी जालें । कर्त्यापूर्वीं आडळलें । न पाहिजे कीं ॥ २६ ॥ केलें तें पंचभूतिक । आणि पंचभूतिक ब्रह्मादिक । तरी भूतांशें पंचभूतिक । केलें तें घडेना ॥ २७ ॥ पंचभूतांस वेगळें करावें । मग कर्त्यास वोळखावें । पंचभूतिक तें स्वभावें । कर्त्यांत आलें ॥ २८ ॥ पंचभूतांवेगळें निर्गुण । तेथें नाहीं कर्तेपण । निर्विकारास विकार कोण । लावूं शके ॥ २९ ॥ निर्गुणास कर्तव्य न घडे ।

सगुण जाल्यांत सांपडे । आतां कर्तव्यता कोणकडे । बरें पाहा ॥ ३० ॥ लटिक्याचा कर्ता कोण । हें पुसणेंचि अप्रमाण । म्हणोनि हेंचि प्रमाण । जें स्वभावेंचि जालें ॥ ३१ ॥ येक सगुण येक निर्गुण । कोठें लावूं कर्तेपण । या अर्थाचें विवरण । बरें पाहा ॥ ३२ ॥ सगुणें सगुण केलें । तरी तें पूर्वींच आहे जालें । निर्गुणास कर्तव्य लाविलें । न वचे कीं कदा ॥ ३३ ॥ येथें कर्ताचि दिसेना । प्रत्ययो आणावा अनुमाना । दृश्य सत्यत्वें असेना । म्हणोनियां ॥ ३४ ॥ केलें तें अवघेंचि लटिकें । तरी कर्ता हें बोलणेंचि फिकें । वक्ता म्हणे रे विवेकें । बरें पाहा ॥ ३५ ॥ बरें पाहातां प्रत्ययो आला । तरी कां करावा गलबला । प्रचीत आलिया आपणाला । अंतर्यामीं ॥ ३६ ॥ आतां असो हें बोलणें । विवेकी तोचि हें जाणें । पूर्वपक्ष लागे उडवणें । येरवीं अनिर्वाच्य ॥ ३७ ॥ तंव श्रोता करी प्रश्न । देहीं सुखदुःखभोक्ता कोण । पुढें हेंचि निरूपण । बोलिलें असे ॥ ३८ ॥ इति श्रीदासबोधे गुरुशिष्यसंवादे कर्तानिरूपणनाम समास अष्टम ॥ ८ ॥

परिशिष्ट ५ - सोलीव सुख

जयजयाजी सुद्गुरुवर्या । पूर्णब्रह्म प्रतापसूर्या ।
तुज नमोजी आचार्या । करुणासिंधो ॥ १ ॥
जे भवसमुद्रीं पोळले । विषयमदें अंध जाहले ।
चौऱ्यांशींत वाहू लागले । मार्ग सुचेना तयांसी ॥ २ ॥
ऐसें विश्व बहुत बुडालें । मी जीव म्हणोनि धांवूं लागले ।
मुळीचें स्मरण विसरलें । मी कोण ऐसें ॥ ३ ॥
तयासी मुक्त करावया पूर्ण । तू वा उतरलासि ज्ञानघन ।
रोगिया औषधी देऊन । भवमोचन करिशी ॥ ४ ॥
ऐसें औदार्य तुझें सघन । म्हणोनि आलों मी शरण ।
दयार्णवा कृपा करून । मज दातारें तारावें ॥ ५ ॥
आपण आपणातें पावे । ऐसें माझे मनी बोलावें ।
तें दातारें गोचर करावें । रोकडें ब्रह्म ॥ ६ ॥
ऐसा शिष्याचा प्रश्न ऐकोनी । ज्ञानाचें भरतें आले स्वामीलागोनी ।
आसन सांडोनियां तये क्षणीं । कडकडोनी भेटले ॥ ७ ॥

रे बाळका ! ऐक निर्धार । तुझा प्रश्न तो वाग्दोर ।
माझे कंठीं बैसला साचार । बरें घेईं निजवस्तु ॥ ८ ॥
मग स्नेहाळें नवल केलें । वोसंगासी शिष्या घेतलें ।
अर्धमात्रा रस काढिले । पूर्ण फुंकिले कर्णरंध्रीं ॥ ९ ॥
खडतर औषधी दिव्य रसायन । नयनीं झोंबले जाऊन ।
डोळियाचा डोळा फोडून । चित्सूर्य भेदिले ॥ १० ॥
पूर्ण अंश गगनी भेदिला । अर्क तो पिंडीमाजी उतरला ।
त्रिकूट श्रीहाट चुराडा केला । सेखीं भरला गगनगर्भीं ॥ ११ ॥
उग्र तेज लखलखाट । तेथें जाला चौदेहांचा आट ।
भ्रांति पडली बळकट । तेव्हां बाळ निचेष्टित पडे ॥ १२ ॥
ऐसें पाहोनि सद्गुरुनाथ । पद्महस्त मस्तकी ठेवित ।
वत्सा सावध त्वरित । निजरूप पहा आपुलें ॥ १३ ॥
जागृत करोनि ते वेळीं । अजपाची दोरी देउनी जवळी ।
विहंगम डोल्हारीं तयेवेळीं । अलक्ष्यलक्षीं बैसविले ॥ १४ ॥
धैर्याचें आसन बळकट । आणि इंद्रियें ओढूनि सघट ।
धरें ऊर्ध्वपंथें वाट नीट । अढळपदीं लक्ष लावी ॥ १५ ॥
पुढें करूनियां जाणिव । मागें सारोनि नेणिव ।
जे जे जाणिव अभिनव । ते तूं नव्हेसी तत्वता ॥ १६ ॥
तें मार्गाची करूं नव्हाळी । प्रथम घंटानादाची नवाळी ।
दुसरी किंकिणीची मोवाळी । तिसरी अनुहतकोल्हाळ ॥ १७ ॥
आतां अग्रीं लक्ष लावी । काय दिसेल तें न्याहाळी ।
चंद्रज्योती प्रकाशली । व्यूह बांधिला बळकट ॥ १८ ॥
तें सुख अंतरीं घेउनी । पुढें चाल करी संगमीं ।
तेथें विजुऐसा कामिनी । चमकताती सुवर्णरंग ॥ १९ ॥
तेही जाणोनि मागें सारी । पुढें सूर्यबिंब अवधारी ।
ज्वाळा निघती परोपरी । डंडळूं नको कल्पांतीं ॥ २० ॥
वायोमुख करोनि तेथें । गिळी वेगें सूर्यकिरणांतें ।
मग देखसी आनंदमार्तंडातें । तेजोमय मम पुत्रा ॥ २१ ॥
अनंत भानु तेज अद्भुत । खदिरांगार ज्वाळा उसळत ।
धारिष्ट तेथें न निभत । दुर्घट व्यहू तेथीचा ॥ २२ ॥

तेथें हुशारीचें काम । अग्रीं लक्ष लावोनि नेम ।
तीरें लावोनि सुगम । मागें सारी सूर्यातें ॥ २३ ॥
पुढें दिसेल जें नवल । तें पाही हंसमेळ ।
चंद्रकिरण शीतळ । पाहसी तूं मम वत्सा ॥ २४ ॥
तेव्हां मागील दाह शमेल । शीतळाई सर्वांग होईल ।
चंद्राची प्रभा सुढाळ । फडफडीत चांदणें ॥ २५ ॥
तेचि डोळियाचा डोळा पाही । देहातीत वर्म विदेहीं ।
चिन्मय सुखाची बवाई । भोगीं आपुले की गा ॥ २६ ॥
अनुभवाची शीग भरली । आग्रापरी उसळली ।
भूमंडळीं प्रभा पडली । कर्पूरवर्ण नभ जालें ॥ २७ ॥
तया मध्यभागी सघन । अढळपद दैदीप्यमान ।
उर्वरित ब्रह्म जाण । ध्रुव बैसला अढळ ते ॥ २८ ॥
तें तुझें स्वरूप नेटेबोटें । जेथें समस्त जाणणें आटे ।
ऐकें जालासी धिटे । बळकटपणें बलाढ्य ॥ २९ ॥
ऐसें सुख योगियां लाधलें । तेव्हां देहाचें मरण गेलें ।
सांगणें ऐकणें मुरालें । एकत्वपणें एकचि ॥ ३० ॥
शांति येऊनि माळ घाली । अलक्ष्यसेजे निजली ।
हंसपदें ऐक्य जाली । सुख सुखातें निमग्न ॥ ३१ ॥
तेथील अनुभव घेउनी । स्वानुभव पाहे कलटुनी ।
आला मार्ग ते क्षणीं । दिसेनासा जाला की ॥ ३२ ॥
त्रिकूट श्रीहाट गोल्हाट । बुडालें तें औटपीठ ।
इडा पिंगळा सुषुम्नातट । विराले ते स्वात्मसुखें ॥ ३३ ॥
स्थूळ सूक्ष्म कारण । नेणों काय जालें महाकारण ।
इंद्रियें चुबकलीं जाण । धांव मोडली तयांची ॥ ३४ ॥
पंचभूतांचें खवलें । तयांचे ठावचि पुसले ।
अपरिमित आनंदले । निमग्न जाले सुखांत ॥ ३५ ॥
सखोल भूमिके ऐसें जालें । सुख सुखासी घोटलें ।
स्वयें आत्मत्व प्रगटलें । माझे देहीं रोकडें ॥ ३६ ॥
मग सहज समाधि जिरवून । शिष्य उठला घाबरा होऊन ।
हे सद्गुरूचें देणें । काय उत्तीर्ण म्यां व्हावें ॥ ३७ ॥

जरी स्तुती तयाची करावी । माझी मती नाहीं बरवी ।
अनिर्वाच्य गती बोलावी । परा वाचा कुंठित ॥ ३८ ॥
आतां जी मी लडिवाळपणें । तुमचे कृपेनें करितों स्तवन ।
सूर्यापुढें खद्योत जाण । तैशापरी बोल हे ॥ ३९ ॥
जयजयाजी करुणासिंधू । जयजयाजी भवरोगवैदू ।
जयजयाजी बाळबोधू । कृपाघना समर्था ॥ ४० ॥
जयजयाजी अविनाशा । जयजयाजी परेशा ।
जयजयाजी अध्यक्षा । दर्याणवा ॥ ४१ ॥
जयजयाजी पूर्णचंद्रा । जयजयाजी अलक्ष्यविहारा ।
जयजयाजी भवसिंधुभास्करा । आनंद प्रभु ॥ ४२ ॥
तुझी स्तुती करितां सांग । वेदस्तुती जाले अव्यंग ।
तेथें प्राकृत मी काग । वर्णाविया योग्य नव्हे ॥ ४३ ॥
कल्याण म्हणे जी रामदासा । माझा मुकेपणाचा ठसा ।
ते मोडोनि वसोसा । मज आपणाऐसें केलें ॥ ४४ ॥
ऐकोन मृदुवचन । कुरवाळलें तयालागुन ।
गुरुशिष्य हें बोलणें । उरलें नाहीं ते वेळीं ॥ ४५ ॥
एकपणें एकचि जालें । ऐक्यरूपीं सम मिळालें ।
करूनियां सुख उसळलें । नाहींपण जाउनी ॥ ४६ ॥
सुगरिणीचा पाक जाहला । नभाभाजनीं वाढिला ।
अक्षयपदीं सुगरावला । संत जेवती स्वानंदें ॥ ४७ ॥
अनिर्वाच्य बोल बोलिले । साधकाचे उपेगा आले ।
सिद्ध तरी डोलों लागले । बद्ध मुमुक्षु होताती ॥ ४८ ॥
यापरतें आन नाहीं बोलणें । श्रीराम दाशरथीची आण ।
एकपत्नी तो सुजाण । आपुलें पद दे दासा ॥ ४९ ॥
इति श्रीदासबोधग्रंथ । त्यांतील हा सोलीव अर्थ ।
श्रोते ऐकतां यथार्थ । समाधिस्थ होती ॥ ५० ॥

॥ श्रीरामचंद्रार्पणमस्तु ॥

परिशिष्ट ६ - श्रीगीतदासबोध

नमन

'यो जातो मरुदंशजः क्षितितले संबोधयन् सज्जनान् ।
ग्रन्थं योऽरचयत्सुपुण्यजनकं श्रीदासबोधाभिदम् ।
यः कीर्त्या पठनेन सर्वविदुषां स्वान्तापहारिः सदा ।
सोऽयं मुक्तिकरः क्षितौ विजयते श्रीरामदासो गुरुः ॥'

गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णुर्गुरुर्देवो महेश्वरः ।
गुरुः साक्षात्परब्रह्म तस्मै श्रीगुरवे नमः ॥

॥ श्रीगजानन ॥
॥ श्रीराम जयराम जयजय राम ॥
ॐ
(राग - देसकार)
उठा उठा हो उठा झडकरी
आलि पहा ही समर्थ स्वारी
पायि खडावा हातात स्मरणी
रामनाम जपे मंजुळवाणी ॥

खमाज (दे/दे)
'शुकासारिखे पूर्ण वैराग्य ज्याचे
वसिष्ठापरी ज्ञान योगेश्वरांचे ।
कवी वाल्मिकासारिखा मान्य ऐसा
नमस्कार माझा सदा रामदासा ॥

(भजन)
रामदास गुरु माझे आई
मजला ठाव द्यावा पायीं ॥

गीत १) दासबोध हा समर्थ विरचित

(राग - मिश्रमांड अथवा वसंत बहार, ताल - केरवा)

दासबोध हा समर्थ विरचित
जीवनात उद्धरी
नितनेमें साधकें वाचितां
ज्ञानोदय अंतरीं ॥ धृ० ॥
दशकी असती दहा समास
वीस दशकमय हा उपदेश
व्यवहारी वा परमार्थी वा
दीप शोभतो करीं ॥ १ ॥
गुरुशिष्यांचा हा संवाद
विविध ग्रंथिचा त्यात प्रसाद
संशय सोडुनि पान करावें
अमृत हे सत्वरीं ॥ २ ॥
भाव ज्याचिया मनिचा जैसा
लाभ तयाला होईल तैसा ।
बन्धनातुनि मुक्ति मिळोनी
मन आनंदे भरी ॥ ३ ॥

गीत २) देइ कवनीं रम्यता

(राग - जनसंमोहिनी अथवा तिलककामोद, ताल - रूपक)

सद्गुरु श्री रामराया
देइ कवनीं रम्यता ।
गीतरूपी दासबोधा
तव पदीं मीं अर्पितां ॥ धृ० ॥

विघ्नहर्त्या श्रीगणेशा
स्फूर्ति दे मजला अता ।
शारदे तूं मजसि देई
बुद्धिची ओजास्विता ॥ १ ॥

सद्‌गुरुंचे स्तवन गातां
शब्द होती बापुडे ।
पूर्णता मिळते परी
सद्गुरुंना वंदितां ॥ २ ॥

बुद्धिमंता श्रोतृवृंदा
करितसे मी वंदना ।
येथे होवो दासबोधा
गायनीं ह्या सांगता ॥ ३ ॥

गीत ३) जीवनीं गुरुबोधातें स्मरा ।

(राग - तिलंग, ताल - त्रिताल)

नरदेहाची प्राप्ती झाली
सार्थक त्याचें करा ।
जीवनीं गुरुबोधानें स्मरा ॥ १ ॥

पशुदेही हो नाही सद्‌गति
नरदेहि मिळे अंतिम मुक्ती ।
रोगाने ना जर्जर झाला
तोवरि त्या उद्धरा ॥ २ ॥

हें माझें घर हें माझें घर
अभिमान असा वृथा विरंतर ।
घर सर्वांचें दो दिवसांचें
दर्प मनीचा हरा ॥ ३ ॥

परमार्थी लाविता शरीर
सुखशांती जी लाभे थोर ।
अवीट त्यांतील रस तो मधुर
प्राशुनी स्वहिता तुम्ही करा ॥ ४ ॥

(दशक १, समास १०)

गीत ४) पढतमूर्ख

(राग - पूरियाधनाश्री, ताल - केरवा)

तयाला पढतमूर्ख म्हणती ॥ धृ० ॥
सूज्ञ असोनी जो अज्ञानी
मनीं एक परि दुसरेंच जनी
स्वार्थी वाटे रती ॥ १ ॥
एक सांगुनी करितो दुसरें
तमोगुणीं जो नित्य संचरे ।
विषयीं रुचि ज्या अती ॥ २ ॥
अधिकाराविण बोध करी जो
मानवस्तवना करी नित्य जो
परमार्थी अरुची ॥ ३ ॥

(दशक २, समास १)

गीत ५) उत्तम गुण तूं सोडू नको

(राग - भीमपमलास किंवा ललत, ताल - केरवा)

वितंडवादा घालु नको रे
उत्तमगुण तूं सोडुं नको ॥ धृ० ॥
राग तुला अनिवार नको रे
धूम्रपान तूं करूं नको ।
देवाला जर नवस बोलला
फेडायला विसरु नको ॥ १ ॥

कुळाचार तूं सोडूं नको रे
अतिभोजन तूं करुं नको ।
अतिनिद्रेचा त्याग करी तूं
गुरुविण भटकत राहु नको ॥ २ ॥

पैज कधीही मारु नको तूं
भांडणात तव भाग नको ।
बाष्कळ बडबड करूं नको तूं
गुरुबोधा ह्या विसरु नको ॥ ३ ॥

ओळखल्याविण संसाराचें
फळ जीवा तूं चाखु नको ।
मायापाशीं बद्ध होउनी
आत्मरूप तूं विसरू नको ॥ ४ ॥

(अनेक भजनी मंडळांत हे गीत म्हटले जाते.) (दशक २, समास २)

गीत ६) कशाला बाह्यरूप पूजिशी

(राग - चंद्रकांस, ताल - भजनीठेका)

सत्त्वरजांचे तमोगुणाचें
रूप जरी जाणिसी ।
कशाला बाह्य रूप पूजिसी ॥ धृ० ॥

प्रेम वाटतें परोपकारीं
ईश्वरभजनीं गोडी भारी ।
सत्त्वगुणा जर अपुला करिसी ॥ १ ॥

शमवि वासना, जिंकी रसना
संसारीं ना उरे कामना ।
देह बुद्धिला दूर करुनी
मोक्ष जरी वांछिसी ॥ २ ॥

जन्म हा दुःखाचा अंकुर
जन्म हा शोकाचा सागर ।
जन्मभयाचा डोंगर सरतां
काय कमी तुजसी ॥ ३ ॥

(दशक २, समास ४)

गीत ७) त्रिविध ताप हरती

(राग - मिश्रपहाडी मांड, ताल - भजनी धुमाळीठेका)

गुरुकृपेचा प्रसाद मिळता
त्रिविध ताप हरती ।
सद्गुरु मोक्षपदीं नेती ॥ धृ० ॥
बालपणीं तूं खेळि रंगसी
तारुण्यी रतिसुखांत रमसी ।
म्हातारा तूं जर्जर होतां
दुःखांची संगती ॥ १ ॥
देह इंद्रियां प्राणांना जें
सुख अथवा रे होई दुःख ।
आध्यात्मिक तो ताप रोग बहु
क्षणात विलया जाती ॥ २ ॥
पंचभूत कोपतां जगांत
अपघात इथे जेव्हां घडत ।
प्रभाव जाणा आधिभौतिक
प्राणी व्याकुळ होती ॥ ३ ॥
करितो जैसे तैसे भोगी
यमसदनीं जे कष्ट अभागी ।
ताप तो आसे आधिदैविक
विवश होतसे स्थिती ॥ ४ ॥

(दशक ३, समास ८)

गीत ८) देह ही रत्नांची मालिका

(राग - बागेश्री/मांड, ताल - कवाली/केरवा)

भजनांच्या रत्नांनी भरली
जादूची पेटिका
देह ही रत्नांची मालिका ॥ धृ० ॥
कोण समय तो येईल कैसा
याचा न कळे असे मुळी भरवसा ।
पक्ष्यांपरी दशदिशी उडोनी
जाइल वेळ फुका ॥ १ ॥
सेवा जगतीं धनी जनांची
पोटासाठी करावयाची ।
निर्मिति ज्यानें केली त्याच्या
स्मरणा चुकवूं नका ॥ २ ॥
गळास भुलतो जैसा मासा
नादलुब्ध हो मृगही तैसा ।
विषयसुखाच्या मायाजाळीं
फसुनी जाऊ नका ॥ २ ॥
सुख लाभावें वाटे ऐसें
श्रीरामाचें भजन करितसे ।
स्वजनांचा मग त्याग करितां
भजन विसरु नका ॥ ४ ॥

(दशक ३, समास १०)

गीत ९) नवविधा भक्ती

(राग - पिलू, ताल - भजनी धुमाळी ठेका)

नवविधा भक्ती करितां
तोषतसे रामराया ॥ धृ० ॥
रामनाम हा मंत्र थोर
सदा जीवनीं ऐकूया ॥ १ ॥

कीर्तनात नाचू रंगे
स्मरणात देव जाणे
चरणांची सेवा करुनी
नित्य देवाला पूजू या ॥ २ ॥
करु देवासी नमन
साधुसंतांना वंदन
देवकार्यि सेवा करुनी
सख्य देवांशी जोडू या ॥ ३ ॥
देव कृपेचा सागर
देव दयेचा पाझर
देव भक्त एक होतां
भक्त जातो मोक्ष धामां ॥ ४ ॥
दासबोध चित्तीं स्मरुनी
सुखे संसार तरूया ।
आत्मनिवेदन भक्ती
नवविधा प्रेमें करुया ॥ ५ ॥

(दशक ४, समास १ ते ५)

गीत १०) सत्यगुरूचे चरण धरा

(राग - भैरवी, ताल - केरवा)

सत्य गुरुचे चरण धरा
दुःखे सारीं झणीं हरा ॥ धृ० ॥
गुरुमुळे हो ज्ञान मिळे
गुरुविण सर्वहि होत पांगळें ।
गुरुविण कोणा मोक्ष आढळे
निश्चय ऐसा मनीं धरा ॥ १ ॥
गुरु असती रे बहुविध जगती
सद्गुरु परि ते दुर्लभ असती ।

ऐसे वैसे गुरु जरि मिळती
त्यांना तुम्ही दूर करा ॥ २ ॥
मोक्ष देई जो मिळवुनि भक्तां
ऐसा सद्गुरु भाग्यें मिळतां ।
सच्छिष्यानें साधन करितां
मुक्तिलाभ होतसे तया ॥ ३ ॥

(दशक ५, समास १, २)

गीत ११) शरण गुरुला जातां

मोक्षपदाची प्राप्ति होतसे
शरण गुरुला जातां ॥ धृ० ॥
शिष्य असे जर श्रद्धायुक्त
सद्गुरु करिती त्याचें सुहित ।
काया वाचा मनें करुनी
परमार्थीं रंगतां ॥ १ ॥
देवाहुनिही थोर गुरु असे
विषयसुखीं मग अरुची भासे
काखेमध्यें कान्ता घेउनि
विरक्त कैसा म्हणता ॥ २ ॥
संसाराच्या संगे ज्याला
सुख झाले ना असा पाहिला ।
उपदेश मिळे सुखहि तत्त्वतां
शरण गुरुला जातां ॥ ३ ॥

(दशक ५, समास ३)

गीत १२) तत्त्व कसें उमजावें

(राग - पिलु)

नाममंत्र जगिं अगणित असती
तत्त्व कसें उमजावें ?
कुणी सांगती भजा शिवाला/(हराला)
हरिला तुम्ही भजावें ॥ धृ० ॥

विठ्ठल विठ्ठल कृष्ण कृष्ण कुणि
दत्त दत्त मोरया
उपासना बहुविधा सांगती
सुख जगतीं मिळवावें ॥ १ ॥
योगयाग कुणि तंत्रमंत्र ही
बाहुविध उपदेशिती ।
ज्ञानाविण परि व्यर्थचि स्वरें
तत्त्व कसें उमजावें ? ॥ २ ॥
नाना शास्त्रें वाचिलीं जरी
नाना दैवत पूजना करी ।
आत्मज्ञान नसे तरि सारें
निष्फळ तें समजावें ॥ ३ ॥

(दशक ५, समास ४)

गीत १३) ज्ञान असे बहुविध जगतीं

ज्ञान असे बहुविध जगती
परि आत्मरूपज्ञाने महती ॥
ज्ञान जाण आत्मज्ञान
द्वैतभावना निरसन
ब्रह्मरूप तैं होऊन
महावाक्य जाणी चित्तीं ॥ १ ॥
शुद्धज्ञानें आनंदात
भावबळें मग्न होत
नाना ग्रंथांचें वाचन
आत्मानंदाची प्रचीती ॥ २ ॥
गुरुकृपा ना लाभली
वृत्ति तन्मय ना झाली
व्यर्थ रूदि ना सोडीली
कैसी तरी होय प्रगती ? ॥ ३ ॥

(दशक ५, समास ५-६)

गीत १४) बद्ध होतसे जगीं

विसरुनि जातां स्वरुप अपुलें
बद्ध होतसे जगीं ॥ धृ० ॥
अतिसेवन विषयांचे जीव
करितो स्वार्थाची मति हाव
समाधान मग दुर्लभ भाव
संसारीं सुख भोगी ॥ १ ॥
विषयसुखाचा ध्यास सदैव
जागृतींत वा स्वप्नीं जाणीव ।
मीच असे हो जगात देव
कळेना, नर तो दुर्भागी ॥ २ ॥
संसाराची अविरत चिंता
कनक कामिनी यातचि रमतां
सत्संगाची आवड नसता
कैसा होय विरागी ? ॥ ३ ॥

(दशक ५, समास ७)

गीत १५) आत्मज्ञान ज्ञान जाण

आपणासी आपण
पहावें हीं खूण ।
आत्मज्ञान ज्ञान जाणा
तेंची सत्य जाणावे ॥ १ ॥
मुख्य देवासी जाणणें
सत्यरूप ओळखणें ।
नित्यानित्य भेद जाणें
ज्ञान हेंचि अन्य नेणें ॥ २ ॥
स्वप्निं इंद्रियांचा लोप
मन करी आपोआप ।
जागेपणीं त्यांचा व्याप
सर्वथैव भिन्न ॥ ३ ॥

गाढ झोपेंत नुरेना
स्वप्न जागृतीचा अंश ।
चाले श्वासोच्छ्वास मात्र
साक्षीभूत तें जीवांश ॥ ४ ॥

परी तुझिया स्थितींत
स्वप्न जागृती सुषुप्ती ।
तिन्ही लुप्त होऊनीयां
साक्षित्वानें तैं पाहती ॥ ५ ॥

साक्षित्वाचा लय होई
मनाचाही होतो लोप ।
उन्मनी त्या अवस्थेत
ज्ञानाचें तें सत्य रूप ॥ ६ ॥

महावाक्याचा लक्ष्यार्थ
जेव्हा पूर्ण ये लक्षात ।
ब्रह्मरूप तैं आपुलें
जाणोनियां हो अद्वैत ॥ ७ ॥

व्यास वसिष्ठा शुकांना
नारदांना जनकांना
नामदेव वाल्मीकींना
अत्रि शौनिकादिकांना ॥ ८ ॥

आदिनाथा मीननाथा
गोरखांना शुद्ध ज्ञान ।
लाभुनिया जें शंकर
ज्ञानानंदी हो निमग्न ॥ ९ ॥

गुरुकृपा होता मिळतें
शुद्धज्ञान तें जगांत ।
नाही वेदान्त वाचून
ग्रंथ संस्कृत प्राकृत ॥ १० ॥

गीत १६) साक्षात्कार

(राग - भैरवी)

नका करू खटपट
पहा माझा ग्रंथ नीट
तेणें सायुज्याची वाट
गवसेल की ॥ १ ॥

आत्मराम दासबोध
माझे रूप स्वतःसिद्ध
असतां न करावा हा खेद
भक्तजनीं ॥ २ ॥

जयात्स उपासना जैसी
तेणें भजावें आपुल्या देवासी ।
ऐसा निदिध्यास झालिया नेमेंसी
साक्षात्कार होय ॥ ३ ॥

त्यांची उपासना जैसी
त्याची भक्ति या देवासी ।
ऐसा निदिध्यास होता
झालिया नेमेंसी साक्षात्कार होय ॥ ४ ॥

❋ ❋ ❋

श्रीदासबोधाचे सांप्रदायिक परिपाठ

दररोज स्नानसंध्या, देवपूजा वगैरे नित्य धर्मकर्म केल्यावर श्रीदासबोधग्रंथाचे निदान दोन समास, मनोबोध म्हणजेच मनाच्या श्लोकातील अकरा श्लोक आणि दोन करुणाष्टके म्हणावीत. मननपूर्वक अर्थ लक्षात घेऊन दोन समास तरी रोज वाचावेत. श्रीदासबोधाची एकशे तेरा पारायणे करण्याचा संकल्प श्रीगुरुचरणी करून, दर एकादशीला नव्या पारायणाला आरंभ करण्याची पद्धती आहे. पारायण पंधरा दिवसात पुरे व्हावे हा उत्तम मार्ग. रोज नियमित वाचन करण्यापूर्वी म्हणावयाचे मंगलाचरण असे आहे :-

गणेशः शारदा चैव सद्गुरुः सज्जनस्तथा ।
आराध्यदैवतं गुह्यं सर्वं मे रघुनन्दन : ॥ १ ॥
गणेश शारदा सद्गुरु । संत सज्जन कुळेश्वरु ।
सर्वही माझा रघुवीरु । सद्गुरुरूपें ॥ २ ॥
माझें आराध्य दैवत । परमगुह्य गुह्यातीत ।
गुह्यपणाची मात । न चले तेथें ॥ ३ ॥
यो जातो मरुदंशजो क्षितितले संबोधयन् सज्जनान्
ग्रंथं यो रचयन् सुपुण्यजनकं श्रीदासबोधाभिधम् ।
यः कीर्त्या पठनेन सर्वविदुषां स्वांतापहारिः सदा
सोयं मुक्तिकरः क्षितौ विजयते श्रीरामदासो गुरुः ॥ ४ ॥
शुकासारिखें पूर्ण वैराग्य ज्याचें
वसिष्ठापरी ज्ञान योगेश्वराचें ।
कवी वाल्मिकासारिखा मान्य ऐसा ।
नमस्कार माझा सद्गुरु रामदासा ॥ ५ ॥
मला वाटतें अंतरीं त्वां बसावें ।
तुझ्या दासबोधासि त्वां बोधवावें ।
अपत्यापरी पावया प्रेमग्रासा ।
महाराजया सद्गुरो रामदासा ॥ ६ ॥

दररोज वाचन पुरे झाल्यावर श्रीदासबोधाच्या उपसंहारातील म्हणजे विसाव्या दशकाच्या दहाव्या समासातील शेवटच्या बारा ओव्या म्हणून,

श्रीदासबोधाची आरती करण्याची सांप्रदायिक शिस्त आहे. त्या ओव्या दासबोधाच्या या तोंडओळखीचेही दररोज नियमाने वाचन करण्याचे ठरविल्यास म्हणावयाला उपयोगी पडाव्यात या हेतूने येथे दिल्या आहेत. श्रीदासबोधाची आणि श्रीसमर्थांची आरती पुस्तकाचे शेवटी दिली आहे.

जालें साधनाचें फळ । संसार जाला सफळ ।
निर्गुण ब्रह्म तें निश्चळ । अंतरीं बिंबलें ॥ (२०.१०.२६)
हिसेब जाला मायेचा । जाला निवाडा तत्त्वांचा ।
साध्य होतां साधनांचा । ठाव नाहीं ॥ २७ ॥
स्वप्नीं जें जें देखिलें । तें तें जागृतीस उडालें ।
सहजचि अनिर्वाच्य जालें । बोलतां न ये ॥ २८ ॥
ऐसें हें विवेकें जाणावें । प्रत्ययें खुणेसी बाणावें ।
जन्ममृत्यूच्या नावें । शून्याकार ॥ २९ ॥
भक्ताचेनि साभिमानें । कृपा केली दाशरथीनें ।
समर्थकृपेची वचनें । तो हा दासबोध ॥ ३० ॥
वीस दशक दासबोध । श्रवणद्वारें घेता शोध ।
मननकर्त्यास विशद । परमार्थ होतो ॥ ३१ ॥
वीस दशक दोनशें समास । साधकें पहावें सावकास ।
विवरतां विशेष विशेष । कळों लागे ॥ ३२ ॥
ग्रंथाचें करावे स्तवन । स्तवनाचें काय प्रयोजन ।
येथें प्रत्ययास कारण । प्रत्ययो पहावा ॥ ३३ ॥
देहे तंव पांचा भूतांचा । कर्ता आत्मा तेथींचा ।
आणी कवित्वप्रकार मनुष्याचा । कशावरुनी ॥ ३४ ॥
सकळ करणें जगदीशांचें । आणी कवित्वचि काय मनुष्याचें ।
ऐशा अप्रमाण बोलण्याचें । काय घ्यावें ॥ ३५ ॥
सकळ देहाचा झाडा केला । तत्त्वसमुदाय उडाला ।
तेथें कोण्या पदार्थाला । आपुलें म्हणावें ॥ ३६ ॥
ऐसीं हीं विचाराचीं कामें । उगेंच भ्रमों नये भ्रमें ।
जगदीश्वरें अनुक्रमें । सकळ केलें ॥ ३७ ॥

❖ ❖ ❖

आरती श्रीदासबोधाची

वेदांतसंमतीचा काव्यसिंधु भरला ।
श्रुति शास्त्रग्रंथ गीता साक्ष संगम केला ।
महानुभाव संतजनीं अनुभव चाखीला ।
अज्ञान जडजीवां मार्ग सुगम जाला ॥
जय देवा दासबोधा ग्रंथराज प्रसिद्धा ।
आरती वोवाळीन विमळज्ञान बाळबोधा ॥ ध्रु० ॥
नवविधा भक्तिपंथें रामरूप अनुभवी ।
चातुर्यनिधी मोठा मायाचक्र उगवी ।
हरिहरहृदयीचें गुह्य प्रगट दावी ।
बद्धचि सिद्ध जाले असंख्यात मानवी ॥ २ ॥
वीसहि दशकीचा अनुभव जो पाहे ।
नित्य नेमें विवरितां स्वयें ब्रह्मचि होये ।
अपार पुण्यगांठी तरी श्रवण लाहे ।
कल्याण लेखकाचें भावगर्भ हृदयीं ॥ ३ ॥

आरती श्रीसमर्थांची

आरती रामदासा । सद्गुरू सर्वेशा ।
काया वाचामनोभावें । वोवाळूं परमेशा ॥ १ ॥
रामदास मूर्तिमंत । रामचंद्र अवतार ।
कलियुगीं अवतरोनी । केला भक्तांचा उद्धार ॥ २ ॥
वैराग्य भक्तिज्ञान । शांती क्षमा विरक्ती ।
विवेक सालंकृत । क्षमा दया सर्व भूतीं ॥ ३ ॥
सच्चिदानंदघन । रामदास केवळ ।
दिनकरकृपायोगें । रामचंद्र निर्मळ ॥ ४ ॥

❖ ❖ ❖ ❖